


दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
वर्ष–४
अंक–२६

## दिव्यातील पाणी प्रश्नावर जवळपास सर्वच विरोधी पक्षाच्या नेत्यांची आंदोलने... पत्रव्यवहार

# आगामी ठाणे महापालिका निवडणुकीत दिव्यात पाणी प्रश्न महत्त्वाचा ठरणार

**दिवा** : आगामी ठाणे महापालिका निवडणुकीत दिवा शहरात पाणी प्रश्न हा महत्त्वाचा मुद्दा ठरणार असे संकेत विरोधकांकडून मिळत आहेत.मागील दोन अडीच वर्षांपासून महापालिका इलेक्शन कधी लागणार याची चर्चा होत असताना सुरुवातीलाच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या दिवा महिला संघटिका ज्योती पाटील व यांच्या वतीने पाणी आंदोलन हाती घेऊन दिव्यातील पाणी समस्येला वाचा फोडण्यात आली.

**सुहास खंडागळे** दिवा न्यूज विशेष















ठाकरेंच्या शिवसेनेचे दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे यांनी देखील दिव्यातील पाणी प्रश्नावर मागील पाच वर्षांपासून आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला धारेवर धरत आहेत.महिलांचे प्रश्न घेऊन ज्योती पाटील या पाणी समस्येवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या माध्यमातून लढत असतानाच दुसरीकडे भारतीय जनता पार्टीच्या वतीने मंडळ अध्यक्ष सचिन भोईर, भाजपचे विजय भोईर त्याचबरोबर रोशन भगत हे देखील पाणी प्रश्नावर महापालिका प्रशासनाला जाब विचारताना दिसत आहेत.पालिका प्रशासनाला भाजपने देखील दिव्यातील पाणी समस्येबाबत अनेक वेळा धारेवर धरले आहे. एकीकडे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि भारतीय जनता पार्टी पाणी प्रश्नावर वेगवेगळ्या माध्यमातून पालिका प्रशासनाकडे आवाज उठवत असतानाच अलीकडे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे विभाग प्रमुख प्रकाश पाटील यांनी देखील उपोषण करत दिवा शहरातील पाणी प्रश्नाला वाचा फोडली.सलग चार दिवस प्रकाश पाटील यांनी दिवा स्टेशन येथे पाणी प्रश्नावर आंदोलन केले.

पालिका प्रशासनाने त्यांना कोणतेही ठोस आश्वासन दिले नाही.मात्र त्यांनी आपला लढा वेगवेगळ्या माध्यमातून सुरूच ठेवला आहे. मनसेचे शहराध्यक्ष तुषार पाटील व प्रशांत गावडे हे देखील पाणी प्रश्नावर महापालिका प्रशासनाकडे वेळोवेळी पत्र व्यवहार करताना दिसतात. वंचितचे विकास इंगळे,अमोल केंद्रे यांनीही त्यांच्या स्तरावर पाणी प्रश्नासाठी आवाज उठवला आहे.एकंदरीत दिवा शहरात पाणी प्रश्न अस्तित्वात आहे. नागरिकांना पाणी समस्या भेडसावत आहे. याचेच प्रतिबिंब विरोधकांच्या पत्रव्यवहार आणि आंदोलनामधून दिसत आहे. काही ठराविक भागांना मुबलक प्रमाणात पाणीपुरवठा होतो.मात्र अनेक भागांना आजही पुरेसे पाणी मिळत नाही. नागरिकांना टँकरने पाणी विकत घ्यावे लागते. टँकरने पाणी विकत घ्यावे लागत असताना नागरिकांच्या महिन्याचे आर्थिक गणित कोलमडते.परिणामी विरोधी पक्षांकडून हा मुद्दा पालिका प्रशासनाकडे मांडला जात असून त्यावर पालिका प्रशासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना होताना दिसत नाही. दिवा शहरातील अंतर्गत जलवाहिन्या या मागील पाच वर्षात टाकण्यात न आल्याने अनेक भागांना कमी दाबाने पाणीपुरवठा होतो. जोपर्यंत अंतर्गत जलवाहिन्या टाकल्या जात नाहीत तोपर्यंत दिवा शहरातील नागरिकांना पुरेशा प्रमाणात पाणी मिळणार नाही अशी भूमिका या आधीच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या दिवा शहर संघटिका ज्योती पाटील यांनी मांडली होती. तर दुसरीकडे मनसेचे प्रकाश पाटील यांनीही केलेल्या उपोषणादरम्यान टँकर लॉबीला जर पाणी मिळते तर जनतेला पाणी का मिळत नाही हा प्रश्न उपस्थित केला होता. भारतीय जनता पार्टीचे विजय भोईर यांनी दिवा शहरातील जनतेला अजून किती दिवस विकतचे पाणी घ्यावे लागणार असा सवाल या आधीच उपस्थित केला आहे.तर भाजपचे सचिन भोईर आणि रोशन भगत यांनी साबे दिवा भागातील नागरिकांना कमी दाबाने पाणी मिळत असल्याचा प्रश्न उपस्थित केला आहे. एकंदरीत विरोधकांमध्ये पाणी प्रश्न दिवावासीयांना भेडसावत असल्याबाबत एकमत दिसते.

दिवा शहरातील पाणी प्रश्न सुटावा यासाठी महापालिकेने ठोस उपाययोजना कराव्यात अशी मागणी विरोधकांकडून होत असताना पालिका प्रशासन मात्र त्यावर ठोस उपाययोजना करण्यात अपयशी ठरले आहे. सर्वच विरोधी पक्ष दिव्यातील पाणी प्रश्नावर सातत्याने बोलत असूनही महापालिका प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करत असल्याने आगामी महापालिका निवडणुकीत पाणी प्रश्न हा दिवा शहरात महत्त्वाचा मुद्दा ठरणार असेच दिसत आहे. शहरातील नागरिकांना मुबलक पाणी उपलब्ध व्हावे यासाठी दिवा शहरातील विरोधी पक्षाचे पदाधिकारी आंदोलन,पत्रव्यवहार करत असताना महापालिका प्रशासनाकडून न होणाऱ्या ठोस उपाययोजना हाच आगामी महापालिका निवडणुका मधील महत्त्वाचा मुद्दा ठरेल असे दिसते.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. २७ जानेवारी २०२५ पान : २
www.diwanews.com

## भारतातील पहिले कृत्रिम बुद्धिमत्ताविद्यापीठमहाराष्ट्रात

### माहिती व तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार

**मुंबई :** 'विकसित भारत २०४७'' मिशनच्या यशस्वी पूर्ततेसाठी आणि भारताच्या ५ ट्रिलियन अर्थव्यवस्थेच्या दिशेने वाटचालीसाठी शिक्षण आणि तंत्रज्ञान महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. त्यामुळे महाराष्ट्र हे भारतातील पहिले कृत्रिम बुद्धिमत्ता विद्यापीठ स्थापन करणारे राज्य असेल असे माहिती व तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले.

जागतिक शिक्षण दिनानिमित्त विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना माहिती तंत्राज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी म्हटले आहे. कृत्रिम बुध्दीमत्ता विद्यापीठ स्थापन करण्याचा राज्य सरकारचा निर्णय ऐतिहासिक ठरणार आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या नेतृत्वाखालील हा प्रकल्प राबवला जाणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रगतीने प्रेरित उद्योग आणि तंत्रज्ञान क्रांतीसाठी विद्यार्थ्यांना आणि तरुणांना आवश्यक कौशल्यांनी सुसज्ज करणारे हे विद्यापीठ असेल.

हे विद्यापीठ अत्याधुनिक संशोधन आणि कौशल्य विकासासाठी केंद्रस्थानी राहील. तसेच हे विद्यापीठ भारतीय तरुणांना कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित जागतिक अर्थव्यवस्थेत नेतृत्व करण्यासाठी तयार करेल,'' असेही ॲड. शेलार यांनी सांगितले.

सरकार लवकरच देशातील पहिले राज्य-स्तरीय कृत्रिम बुद्धिमत्ता व सायबर धोरण जाहीर करणार असून यासाठी एक विशेष टास्कफोर्स स्थापन करण्यात आले आहे. माहिती व तंत्रज्ञान मंत्री यांच्याच नेतृत्वाखाली या धोरणाचा आराखडा तयार होईल. तंत्रज्ञान क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर असेल. आमचे सरकार विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी आणि नवसंकल्पनांच्या संधी निर्माण करण्यासाठी तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शिक्षणात परिवर्तन घडवून, भविष्यकालीन कुशल मनुष्यबळ घडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी म्हटले आहे.

## ठाण्यात दी बर्निंग कार; दोघे बचावले

ठाणे: मुंबई विमानतळ येथून कल्याणला प्रवासी घेऊन निघालेल्या कारने अचानक गुरुवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास कॅडबरी उड्डाणपुलावर पेट घेतला. सुदैवाने कारचालक समीर जाधव यांच्यासह प्रवासी हरेश पुरुषवानी असे दोघे वेळी कारमधून बाहेर पडल्याने बचावले आहेत. तर आगीत कार जळून खाक झाला आहे. चालक जाधव हे प्रवासी घेऊन कल्याणकडे ठाण्यातून कार निघाले होते. ती कार कॅडबरी उड्डाणपुलावर आल्यावर त्या कारला अचानक आग लागली. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दल, शहर वाहतूक पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन या विभागांनी धाव घेतली. तातडीने आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केल्यानंतर ती आग २० मिनिटांनी नियंत्रणात आली.




**दिव्यातील मुंब्रादेवी कॉलनीतील सद्गुरु नगर, येथील श्री कृपा अपार्टमेंट इमारतीत श्री राम सेना मित्र मंडळाच्या वतीने प्रभू श्रीराम मंदिर अयोध्या पहिला वर्धापन दिन सुंदर कांड आणि महाआरती महाभंडारा ठेवण्यात आला होता. यावेळी मंडळाचे कार्यकर्ते व महिला उपस्थित होते.**

## घंटागाडीच्या धडकेने वृद्धाचा जागीच मृत्यू

**दिवा :** ठाणे महापालिकेच्या कंत्राटी तत्वावर असलेल्या घंटागाडीने दिवा पूर्व,संतोष नगर येथील रहिवासी सिताराम सखाराम टोटम (७९) यांना धडक दिल्यानंतर काही अंतर फरफडत नेल्याची घटना शुक्रवारी सकाळी दिवा पूर्व,संतोष नगर येथे घडली. या घटनेची माहिती वाऱ्यासारखी पसरल्यावर दिव्यामध्ये एक संतापाची लाट पसरली. दरम्यान शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाने घंटागाडीवरील चालकावर मनुष्यवादाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे तसेच महापालिका प्रशासनाने टोटम यांच्या कुटुंबाला तात्काल दहा लाखाच्या आर्थिक मदत जाहीर करावी अशी मागणी केली आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या घनकचरा विभागामधील कंत्राटी तत्वावर असणाऱ्या या घंटागाडीवर चालक मनोज कदम आणि त्याच्यासोबत सफाई कर्मचारी प्रमोद भोईर हे दोघे कार्यरत होते. सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास दिवा पूर्व संतोष नगर येथे चालक कदम हा गाडी रिव्हर्स गेअरमध्ये मागे घेत असताना सदर घंटागाडीमध्ये कचरा टाकण्यासाठी आलेल्या टोटम यांना त्या गाडीने धडक देत, काही अंतरावर फरफडत नेले. या अपघातात गंभीररीत्या जखमी झालेल्या टोटम यांना तात्काळ उपचारासाठी कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात नेल्यावर तेथील डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. याप्रकरणी मुंब्रा पोलीस पुढील कार्यवाही करत आहेत.

दरम्यान हा अपघात झाल्यावर स्थानिक नागरिकांनी पाहून आरडाओरडा करत, चालकाला गाडी थांबवण्यासाठी सांगितले. परंतु चालकाच्या कानात हेडफोन असून तो फोन वर बोलत होता असा आरोप नागरिकांनी केला. त्यामुळे सदर व्यक्ती पाठीमागे असल्याचा त्याला लक्षात आले नाही व त्याने त्या व्यक्तीस गाडीखाली चिरडून त्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे घंटागाडी चालकावर मनुष्यवादाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे अशी मागणी करत,महापालिका प्रशासनाने टोटम यांच्या कुटुंबाला दहा लाखाच्या आर्थिक मदत जाहीर करावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे यांनी केली आहे.

## माती नसल्याने ठाण्यातील मुख्य स्मशानभूमीत अर्भकांचा दफनविधी बंद

ठाणे – ठाणे शहरातील मध्यवर्ती स्मशानभूमीमध्ये मातीचा पुरवठा करण्यात येत नसल्याने येथे अर्भकांचा दफनविधी करण्यात येत नसल्याचे उघडकीस आले आहे. येत्या दोन दिवसात येथे दफनविधी सुरू न केल्यास ठामपा मुख्यालयात आंदोलन छेडण्याचा इशारा समाजसेवक संगम डोंगरे यांनी दिला आहे.

ठाणे महानगर पालिकेकडून जवाहर बाग ही स्मशानभूमी संचालित करण्यात येत आहे. या स्मशानभूमीचे काही वर्षांपूर्वीच नूतनीकरण करण्यात आले आहे. हे नूतनीकरण करण्याआधी विद्युत आणि लाकडाच्या दाहिनी लगत लहान मुलांचा दफनविधी करण्यासाठी जागा ठेवण्यात आली होती. हिंदू धर्मात दोन ते तीन वर्षांपर्यंतच्या मृत बालकांवर दहनसंस्कार न करता त्यांना दफन करण्यात येत असते. मात्र, या स्मशानात मातीचा पुरवठाच केला जात नसल्याने येथील दफनविधी अनेक वर्षांपासून बंद आहेत. परिणामी, लहान अर्भकांचे पार्थिव घेऊन कळव्यातील मनिषा नगर येथील स्मशानभूमीत जावे लागत आहे.

या प्रकरणी संगम डोंगरे यांनी ठाणे पालिकेशी पत्रव्यवहार केला असून दोन दिवसात दफनविधी सुरू न केल्यास पालिका मुख्यालयात येऊन ठाणे पालिकेला माती देण्यात येईल, असा इशारा डोंगरे यांनी दिला आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. २७ जानेवारी २०२५ | पान : ३
















**दिव्यातील सद्गुरु नगर येथे माजी नगरसेवक शैलेश पाटील यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी कॉर्नरस्टोन प्रि- स्कूलचे विद्यार्थी व टीचर, दिवा विभागातील नागरिक व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.**

## एन. ए. माफीच्या निर्णयाचा अध्यादेश काढण्याची मागणी

### भाजप जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांची महसूलमंत्र्यांना विनंती

**ठाणे :** ठाण्यासह राज्यभरातील बिगरशेती आस्थापना, इमारती आदींना दरवर्षी भरावा लागणारा अकृषिक कर (एन. ए.) माफ करण्याच्या राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णयासंदर्भात अध्यादेश काढावा, अशी मागणी राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी केली आहे. राज्यातील बिगरशेती आस्थापना, इमारती आदींवर राज्य सरकारकडून अकृषिक कर आकारला जात होता. त्याचा फटका राज्यातील सुमारे सव्वा लाख गृहसंकुलांना बसत होता. त्यात ठाणे शहरातील ६ हजार व जिल्ह्यातील ३३ हजार सोसायट्यांचा समावेश होता. या अन्यायातून नागरिकांची मुक्तता करण्यासंदर्भात ऑक्टोबर २०२४ मध्ये झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत महायुती सरकारने निर्णय घेतला. अकृषिक कर माफीच्या निर्णयामुळे हजारो कुटुंबांना दिलासा मिळाला. मात्र, अकृषिक कर माफ करण्याच्या मंत्रिमंडळाच्या निर्णयानंतरही महसूल विभागाकडून ठाणे शहरातील नौपाडा भागातील रहिवाशी व गृहसंकुलांना अकृषिक कराचा भरणा करण्याच्या नोटीसा बजाविल्या आहेत. या नोटीसांमुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता आहे.

## महिला पोलीस देवकी राजपूतला क्रीडा पुरस्कार




**ठाणे:** ठाण्याच्या नौपाडा येथील हिंदू भगिनी मंडळ याच्यावतीने देण्यात येणारा यंदाचा क्रीडा पुरस्कार ठाणे शहर पोलीस दलात कार्य करणाऱ्या व आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक देवकी राजपूत यांना देवून नुकतेच गौरविण्यात आले. हा पुरस्कार जुदो व कुस्तीच्या क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदान बदल असून राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक खेळाडूंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश संपादन केले आहे. सत्कार समारंभात महिलांना क्रीडा क्षेत्रात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणारे विचार मांडले गेले. या उपक्रमामुळे महिला सशक्तीकरण व क्रीडा क्षेत्रातील सहभागाला नवा बळकटी मिळाली आहे. असेही देवकी राजपूत यांनी बोलताना सांगितले.

# आई जीवदानी सोसायटीच्या वतीने सत्यनारायणाची पूजा आणि हळदीकुंकू उत्साहात संपन्न










**दिवा :-** दरवर्षीप्रमाणे यावर्षीही आई जीवदानी अपार्टमेंटच्या वतीने हळदीकुंकू व सत्यनारायणाची पूजा आयोजित करण्यात आली होती या कार्यक्रमाला समाजसेवक कैलेश पाटील यांची उपस्थिती लाभली.

रविवारी आई जीवदानी अपार्टमेंट (गुरूदर्शन नगर) मध्ये सत्यनारायणाची महापूजा आणि महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता. सोसायटी मधील नागरिकांनी या कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला.यावेळी शिवसेना उपविभाग प्रमुख कैलेश पाटील उपस्थिती होते. महिला वर्ग या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होता.



दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. २७ जानेवारी २०२५ पान : ५
www.diwanews.com

# पातलीपाड्यातील रहिवाशांचा 'जंगल बचाओ'चा नारा!

## जंगलातील कृत्रिम पक्षी उद्यानाला स्थानिकांचा विरोध



**ठाणे** : पातलीपाडा येथील डोंगराबरील १५ एकर नैसर्गिक जंगलाला नेट लावून बंदिस्त पक्षी उद्यान (आयव्हरी पार्क) तयार करण्याच्या प्रकल्पाला स्थानिक नागरिकांकडून तीव्र विरोध करण्यात येत आहे. राज्य सरकारच्या ७० एकरापैकी ५५ एकरावर अतिक्रमणे झाल्यानंतर, रहिवाशांनी वृक्षारोपण व संवर्धन करून जोपासलेल्या जंगलाला वाचविण्याचा निर्धार केला आहे. भाजपाचे गटनेते मनोहर डुंबरे यांच्या नेतृत्वाखाली रहिवाशांनी महापालिका आयुक्त सौरभ राव यांची भेट घेऊन कृत्रिम पक्षी उद्यानाऐवजी नैसर्गिक जंगल बचाओचा नारा दिला.

ठाणे नगर विकास आराखड्यानुसार, पातलीपाड्यातील सर्वेक्षण क्रमांक २८५/२, २७१, आणि १३९ (सुमारे ७० एकर) राखीव जंगल म्हणून घोषित करण्यात आले होते. परंतु, या भागात २००८ पासून अतिक्रमणे सुरू झाली. या संदर्भात हिरानंदानी इस्टेटसह अन्य वसाहतीतील रहिवाशांनी महापालिका, जिल्हाधिकारी आणि तहसीलदार कार्यालयाकडे वारंवार तक्रारी केल्या. परंतु, ठोस कारवाई न झाल्यामुळे, २०११ मध्ये या जमिनीचे राखीव जंगल म्हणून संरक्षण करण्यासाठी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. या भागातील अतिक्रमणे थांबविण्याबरोबरच क्षेत्राचे संवर्धन करण्यासाठी रहिवाशांनी झाडे लावण्याची सातत्यपूर्ण मोहीम हाती घेतली. या प्रयत्नांमुळे गेल्या १३ वर्षात १५ एकर मोकळ्या जमिनीत ५ हजारांहून अधिक स्थानिक झाडांचे संपन्न जंगल तयार झाले आहे. त्याचबरोबर ते पोपट, घार यांच्यासह स्थानिक व परदेशी पक्ष्यांच्या प्रजातींचे निवासस्थान बनले आहे.

या १५ एकर जंगलाच्या क्षेत्राला संपूर्ण जाळीने (नेट) संरक्षित करून पक्षी उद्यान (आयव्हरी पार्क) साकारण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. या पक्षी उद्यानात बाहेरुन आणलेले पक्षी सोडले जाणार आहेत. नेटचे आच्छादन असल्यामुळे ते बाहेर पडू शकणार नाहीत. त्यामुळे स्थानिक पक्ष्यांचा अधिवास संपुष्टात येईल. यापूर्वी राज्य सरकार व ठाणे महापालिकेने साकारलेल्या अनेक प्रकल्पांची दुरवस्था आहे. कळवा खाडी किनाऱ्यावरील डॉ. सलीम अली उद्यानाची दुरवस्था झाली. महापालिकेने उभारलेले नवे ठाणे, जुने ठाणे प्रकल्पही भ्रष्टाचाराच्या गर्तेत गेला. तुर्फेपाडा येथे उभारलेल्या अर्बन फॉरेस्टला आग लागल्याचा प्रकार घडला.

या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था नसल्यामुळे मध्यरात्री मद्यपींच्या पार्ट्या रंगतात. या पार्श्वभूमीवर पक्षी उद्यानाची दुरवस्था झाल्यास, संवर्धन केलेल्या १५ एकरावरील जंगलाचे नुकसान होईल, अशी भीती माजी गटनेते मनोहर डुंबरे यांच्यासह रहिवाशांनी व्यक्त केली. तर संरक्षित जंगल बचाओचा नारा दिला.

दरम्यान, या परिसराला महापालिकेचे सहायक संचालक (नगर रचना) संग्राम कानडे, कार्यकारी अभियंता पाडगावकर, सर्व्हेअर शेलार यांनी भेट देऊन पाहणी केली. त्यावेळी रहिवाशांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. या भागातील रहिवाशांकडून सोमवारी पुन्हा महापालिका आयुक्त सौरभ राव यांची भेट घेण्यात येणार आहे.



# वाढत्या नागरीकरणामुळे पाण्याचा पुर्नवापर करण्यावर भर द्यावा लागणार -आयुक्त सौरभ राव

## ठाणे महापालिका क्षेत्रातील प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर आराखड्याचे प्रकाशन

ठाणे : शाश्वत नागरी विकासासाठी पाण्याचा पुनर्वापर करण्याचे नियोजन करून जल व्यवस्थापनाच्या क्षेत्रात ठाणे महानगरपालिकेने अतिशय महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. या आराखड्याची अंमलबजावणी कालबद्ध रीतीने करण्यात येणार आहे. वाढत्या नागरीकरणामुळे पाण्याचा पुनर्वापर करण्यावर भर द्यावा लागणार असल्याचे प्रतिपादन ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

सध्या ठाणे महापालिका क्षेत्रात दररोज २४१ दशलक्षलीटर सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. त्यापैकी केवळ ५ टक्के पाण्याचा पुनर्वापर होतो. २०३५ पर्यंत हा वापर किमान १६ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. तोवर ४१० दशलक्षलीटर सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पुनर्वापर योग्य करण्याची क्षमता निर्माण होईल. या आराखड्यातून प्रक्रिया क्षमता वाढवणे, जास्तीत जास्त पाण्याचा पुनर्वापर करणे, उद्यान, शौचालये, उद्योग, बांधकाम यासाठी या पाण्याचा वापर वाढवून पिण्याच्या पाण्यावरील अवलंबित्व कमी करण्याचे नियोजन असल्याचे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

उष्णता कृती आराखडा, नागरी पूर व्यवस्थापन नियोजन, हवा गुणवत्ता व्यवस्थापन या तीन आराखड्यानंतर आता पाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे. ठाणे महानगरपालिकेसाठी कौन्सिल ऑन एनर्जी एन्व्हायरमेंट अँड वॉटर (सी ई ई डब्ल्यू) यांनी महापालिकेच्या सर्व विभागांशी संवाद साधून, क्षेत्र भेटी देऊन हा आराखडा तयार केला आहे. त्याचे प्रकाशन गुरूवारी महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, एडीटीपी संग्राम कानडे, उपायुक्त मनोहर बोडके, टीएमटीचे व्यवस्थापक भालचंद्र बेहरे, मुख्य अग्निशमन अधिकारी गिरीश झळके, उप नगर अभियंता विकास ढोले, विनोद पवार, गुणवंत झांबरे, मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, उद्यान अधिकारी केदार पाटील, सीईईडब्ल्यूचे विश्वास चितळे, नितीन बस्सी, साबिया गुप्ता, कार्तिकेय चतुर्वेदी, आयुषी कश्यप आदी उपस्थित होते.

सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी पिण्याव्यतिरिक्त इतर उपयोजनांकरता वापरण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने लक्ष्ये निर्धारित केली आहेत. जलवाहिन्यांच्या अमृत योजनेसाठीही या निकषांची पूर्तता करणे आवश्यक आहे. त्यामुळे सीईईडब्ल्यूने केलेला हा आराखडा ठाण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. देशात अनेक ठिकाणी पाण्याचा पुनर्वापर योजना असल्या तरी याप्रमाणे त्याचा नियोजनबद्ध आराखडा तयार करणारी पहिली महापालिका ठाणे असेल, असेही आयुक्त राव यांनी सांगितले. ठाण्यातील वाढती लोकसंख्या, नागरिकरण यामुळे पाण्याच्या जास्तीत जास्त पुनर्वापराचा विचार महापालिकेस करावाच लागेल, असेही राव याप्रसंगी म्हणाले.

सीईईडब्ल्यू संस्थेने गेल्या सात महिन्यात महापालिकेच्या विविध विभागांशी संवाद साधून हा आराखडा तयार केला आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रांची पाहणी, पाण्याच्या पुनर्वापरासाठी उपलब्ध असलेल्या संधी यांचा अभ्यास करून हा आराखडा तयार करण्यात आल्याची माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांनी दिली.

उद्यान, अग्निशमन सेवा, बस डेपो, रस्ते धुणे, बांधकाम, शौचालय येथे प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर शक्य आहे. तसेच, भूजल वाढवण्यासाठीही या पाण्याचा उपयोग होऊ शकतो. त्यासाठी ठाणे महापालिकेने कशापद्धतीने कमी, मध्यम आणि दीर्घकालीन नियोजन करावे, याची मांडणी या आराखड्यात करण्यात आली आहे. २०४६पर्यंत ठाणे महापालिकेची सांडपाणी प्रक्रियेची दैनंदिन क्षमता ११९५ दशलक्ष लीटर होईल. तर, दैनंदिन स्वरुपात ९७९ दशलक्षलीटर पाण्यावर प्रक्रिया केली जाईल. या पाण्याचा जास्तीत जास्त उपयोग करून त्यातून महापालिकेस शुल्कही मिळू शकेल, असे या सीईईडब्ल्यूचे नितीन बस्सी यांनी स्पष्ट केले.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. २७ जानेवारी २०२५ 

# रंगायतनचे नूतनीकरण रडतखडत अधिकारी-ठेकेदारांना खडसावले...

**ठाणे:** महाराष्ट्राचे वैभव गणले जाणारे ठाणे शहरातील राम गणेश गडकरी रंगायतनचे नूतनीकरण ९० दिवसांत करण्याचे बंधनकारक असताना हे काम रडतखडत सुरू असल्याने ठाणेकर कलारासिकांची कुचंबणा होत आहे. याची दखल घेत आमदार संजय केळकर यांनी पाहणी करत अधिकारी आणि ठेकेदारांना खडसावले तसेच काही सूचना करत १ मे महाराष्ट्र दिनी रंगायतन खुले करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.

गेल्यावर्षी ऑक्टोबर महिन्यापासून सुरू असलेल्या गडकरी रंगायतन नाट्यगृहाच्या नुतनीकरणाच्या कामाची पाहणी आज शनिवारी आमदार संजय केळकर यांनी केली. यावेळी नाट्यकर्मी आणि प्रेक्षकांना केंद्रस्थानी ठेवुन दर्जात्मक काम करताना त्यात दिरंगाई खपवुन घेतली जाणार नसल्याचेही आ. केळकर यांनी बजावले.

यांनी केली. गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात नुतनीकरणाचे काम सुरू झाले असून ९० दिवसांच्या कालावधीत हे काम पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, या कामाला होत असलेला विलंब पाहून आ. केळकर यांनी महापालिकेच्या ढिसाळ कारभाराबद्दल नाराजी दर्शवत संबधित अधिकारी आणि ठेकेदारांना महत्वपूर्ण सुचना केल्या.

ठाणे शहरातील हे महत्वाचे सांस्कृतिक केंद्र असून नुतनीकरणाचे काम सहा महिन्यांत पूर्ण करून येत्या १ मे महाराष्ट्र दिनी रंगायतन खुले करण्याचे निर्देश आ. केळकर यांनी प्रशासनाला दिले. नाट्यगृहाच्या मजबुतीकरणाचे काम दर्जात्मक करून त्यात दिरंगाई होता नये. त्याचबरोबर, विकेण्डला येथे उडणारी झुंबड आणि मासुंदा तलावपाळीवर होणारी गर्दी लक्षात घेत लगतच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या जागेत भव्य वाहनतळ उभारण्यात यावे.'

## १ मे रोजी रंगायतन खुले करा

## - आ.संजय केळकर



ठाणे शहरात सन १९७८ मध्ये बांधण्यात आलेल्या रंगायतनची १९९८ मध्ये पहिल्यांदा दुरुस्ती करण्यात आली होती. त्यानंतर आता २६ वर्षांनी अंर्तबाह्य नुतनीकरण होत असून त्यासाठी ठाणे महापालिका तब्बल २३ कोटी खर्च करीत आहे. या नुतनीकरणाच्या कामाची पाहणी शनिवारी आमदार संजय केळकर

नाट्यगृहाचे पारंपारिकपण जपून उदवाहनाची (लिफ्ट) सुविधा, भव्य रिहर्सल रूम, निकषानुसार आसन व्यवस्था, आधुनिक ध्वनी व्यवस्था आदी सुविधा कलाकार आणि प्रेक्षकांना केंद्रस्थानी ठेवुन करण्यात याव्यात, अशा सुचनाही आ. केळकर यांनी केल्या.

### डॉ. घाणेकर नाट्यगृहात हॉटेलच्या जागी रिहर्सल रूम करा

ठाणे शहर कलाकारांची पंढरी बनत असून कलाकारांसह रसिकांची सांस्कृतिक भूक भागविणाऱ्या वास्तुपैकी एक असलेल्या डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहामध्ये कलात्मक वातावरण हवे, यासाठी तळमजल्यावर असलेले हॉटेल हटवून त्या ठिकाणी रिहर्सल रूम उभारण्याचे निर्देश आ. संजय केळकर यांनी दिले. जेणेकरून अनेक हौशी कलाकारांसह रंगभुषाकार, नेपथ्यकारांना नियमित सराव करण्यासाठी हक्काची जागा उपलब्ध होईल, अशा सुचनाही आ. केळकर यांनी केल्या आहेत.



# ठाण्यातील आनंदआश्रमात स्वर्गीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा जयंतीदिन उत्साहात साजरा

**ठाणे :** गेली अडीच वर्षे माझ्यावर दररोज टीका करण्यात आली, पण टिकेला प्रत्युत्तर देत बसण्यापेक्षा मी टिकेला कामातून उत्तर दिले. अखेर जनतेने दिलेल्या कौलानंतर टीकाकारांची तोंडे बंद झाली असून त्यांच्यावर आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. अजूनही सुधारले नाही तर २० चे २ व्हायला वेळ लागणार नाही असे मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

स्वर्गीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त गुरुवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे येथील टेंभी नाक्यावरील आनंदआश्रमात जाऊन त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना शिंदे यांनी वरील मत व्यक्त केले. पुढे बोलताना बाळासाहेब ठाकरे यांच्या ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण ही शिकवण अंगिकरून आज शिवसेनेची वाटचाल पुढे सुरू आहे. त्यांचे विचार अंगिकारून वाटचाल करताना गेली अडीच वर्षे आम्ही लोकाभिमुख कामकाज करण्याचा प्रयत्न केला. शासन आपल्या दारी, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना यासारख्या लोकाभिमुख योजना राबवल्या. त्या माध्यमातून तळागाळातील माणसाला योजनांचा लाभ मिळवून दिला. शिवसेना ज पक्ष वाचवण्यासाठी आम्ही अडीच वर्षांपूर्वी वेगळा निर्णय घेतला. त्यानंतर आता नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत जनतेने खरी शिवसेना कुणाची ते सिध्द करून दाखवले आहे. जनतेने दिलेल्या पाठबळाच्या जोरावर शिवसेनेचे ८५ पैकी ६० आमदार निवडून आले. तर आमच्यावर टीका करणाऱ्यांचे ९७ पैकी केवळ २० आमदार निवडून आलेत. गेली अडीच वर्षे माझ्यावर दररोज टीका करण्यात आली, पण टिकेला प्रत्युत्तर देत बसण्यापेक्षा मी टिकेला कामातून उत्तर दिल्याचे ही शिंदे यांनी सांगितले.

आज बाळासाहेबांचे हिंदुत्ववादी विचार पुढे घेऊन जाणारे सरकार सत्तेत असून शिवसेना ही आज महायुती सरकारचा भाग आहे. त्यामुळे लोकांना आणि लोकांसाठी काम करणारी संघटना म्हणून शिवसेना आपले कार्य यापुढेही अविरतपणे चालू ठेवेल असा विश्वास यावेळी शिंदे यांनी व्यक्त केला.

यावेळी खासदार नरेश म्हस्के, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी परिवहन सभापती विलास जोशी, ठाणे जिल्हा महिला संघटिका मीनाक्षी शिंदे आणि शिवसेनेचे ठाण्यातील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते आवर्जून उपस्थित होते.




## व्हेल माशाची उलटीसह एकाला अटक


**ठाणे :** आंतरराष्ट्रीय बाजारात मागणी असलेल्या व्हेल माशाची वांती/ उलटी () घेवून विक्री करीता आलेल्या पुण्यातील नितीन मुत्तना मोरेलु याला ठाणे शहर पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून ०५ किलो ४८ ग्रॅम वजनाची व्हेल माशाची उलटी हस्तगत केली असून त्याची अंदाजे किंमत ५ कोटी रूपये असल्याची माहिती ठाणे शहर पोलीस जनसंपर्क अधिकारी तथा वरीष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश साळवी यांनी दिली.

राबोडी, साकेत कॉम्प्लेक्स कडुन क्रिक नाक्याकडे येणाऱ्या रोड येथे एक जण व्हेल माशाची उलटी विक्री करीता येणार असल्याची माहिती ठाणे शहर गुन्हे शाखा १ चे पोलीस उपनिरीक्षक दीपक घुगे यांना मिळाली होती. त्यानुसार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचून नितीन मोरेलू याला अटक केली. याच्या ताब्यातून ०५ किलो ४८ ग्रॅम वजनाची व्हेल माशाची उलटीचे लहान-मोठे आकाराचे लाल रंगाचे तुकडे हस्तगत करण्यात आले.

# शिवसेना ठाकरे गटाच्या ज्योती पाटील यांच्या वतीने विविध उपक्रम संपन्न








**दिवा:–** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व तन्वी फाउंडेशन यांच्या वतीने प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते यावेळी दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील यांच्या वतीने प्रभागातील नागरिकांना आरोग्य योजना कार्ड, विविध शासकीय योजनांचा लाभ व पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी आयोजित करण्यात आलेला पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा सत्कार समारंभ दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील, शहर प्रमुख सचिन पाटील, रोहिदास मुंडे यांच्या वतीने घेण्यात आला असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

या कार्यक्रमाला प्रभागातील नागरिकांनी उपस्थिती लावली होती.यावेळी संजय जाधव, विभाग प्रमुख बेडेकर नगर नागेश पवार, विभाग प्रमुख रवी रसाळ, विभाग प्रमुख गजानन शेलार, उपविभाग प्रमुख शशिकांत कदम, शाखा प्रमुख सुमित अगले शाखाप्रमुख मंगेश शेलार, राजकुमार गुप्ता राजेश गोखले सुवासिनी गोळेकर, प्रेरणा नेवाळे, दत्ता भोसले, प्रमोद काणसे, मूरली मुंडे महेश मुळम, प्रथमेश काणसे, अतिश साळुंखे सचिन कदम सुजित आगळे, शरद जाधव, सर्व कार्यकर्ते व महिला उपस्थित होते.





दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. २७ जानेवारी २०२५
पान : ८
www.diwanews.com

# जय मातादी चाळीमध्ये हळदीकुंकू समारंभ संपन्न

दिवा:-दिव्यातील विकास म्हात्रे गेट येथील जय माता दी चाळमध्ये
श्री सत्यनारायणाची पूजा व हळदी कुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी शर्मिला म्हात्रे, दर्शना बेडके, मनाली उगवे, नेहा उगवे, शैला पाटील, अनिता दळवी, ज्योती दळवी, कल्पना म्हात्रे, रेशमा पवार, अजय म्हात्रे, संदीप बेडके, तेजस होंडे, प्रथमेश म्हात्रे, संतोष शिंदे, सर्व चाळीतील महिला व कार्यकर्ते उपस्थित होते.





# दिव्यातील सिद्धार्थ बौद्ध विहार मध्ये प्रजासत्ताक दिन सोहळा संपन्न





दिवा:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त सार्वजनिक जयंती उत्सव मंडळाचे अध्यक्ष एकनाथ भगत , कार्याध्यक्ष दिनेश पाटील व मान्यवरांच्या उपस्थितीत प्रजासत्ताक दिन सोहळा पार पडला .बी. आर. नगर. सिद्धार्थ बौद्ध विहार येथे सकाळी ९:०० वा झेंडा वंदन करून विहारांमध्ये धम्म वंदना घेण्यात आली. त्या नंतर प्रजासत्ताक दिनानिमित्त मान्यवरांनी आपले विचार मांडले. यावेळी सर्व मंडळातील कार्यकर्ते व महिला उपस्थित होत्या.